E-133

शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ मर्यादित,नाशिक या महामंडळासाठी पदे निर्माण करणेबाबत.

# शासन निर्णय

## आदिवासी विकास विभाग

शासन निर्णय क्रमांक-आविम-१०९९/प्र.क्र.७/का.३
मंत्रालय विस्तार, मुंबई-४०० ०३२,
दिनांक १३ डिसेंबर, १९९९.

of the M.S. Co-op. Tribal Dev. Corporation Ltd. Nasik.-2
Adm. Branch
16 DEC 1999
Manager (Adm)

**वाचा:-** १) शासन निर्णय, आदिवासी विकास विभाग क्रमांक-आविम -२३९६ /४५ /प्र.क्र.३९/ का.३, दिनांक ९ डिसेंबर, १९९८.

२) शासन निर्णय, आदिवासी विकास विभाग क्रमांक- आविम-२३९६/४५/ प्र.क्र.३९/ का.३, दिनांक १ फेब्रुवारी, १९९९.

३) व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळ, नाशिक यांचे पत्र क्रमांक- आविम/प्रशा/शबरी/११०२/९९, दिनांक ६ डिसेंबर,१९९९.

**प्रस्तावना :-** राज्यातील अनुसूचित जमातीतील जनतेची आर्थिक उन्नती घडवून आणण्यांसाठी, शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळाची स्थापना शासन निर्णय, आदिवासी विकास विभाग क्रमांक- २३९६/४५/प्र.क्र.३९/का.३, दिनांक ९ डिसेंबर, १९९८ अनुसार, करण्यांत आलेली आहे. सदर महामंडळाची महाराष्ट्र शासनाचा उपक्रम म्हणून कंपनी कायदा १९५६ अन्वये दि.१५.१.१९९९ रोजी नोंदणी करण्यांत आलेली आहे. सदर महामंडळाचे अधिकृत भागभांडवल रु.१००/-कोटी इतके आहे. त्यातील ५१% हिस्सा राज्यशासनातर्फे देण्यात येणार असून ४९% हिस्सा केंद्र शासनाकडून प्राप्त करुन घेण्यात येईल. सन १९९८-९९ या वित्तीय वर्षात शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळास रु.५.०० कोटी इतकी रक्कम भाग भांडवल म्हणून उपलब्ध करण्यांत आलेली आहे. शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळासाठी आवश्यक ती पदे निर्माण करण्याबाबतचा प्रस्ताव, प्रधान सचिव (वित्त) यांचे अध्यक्षतेखाली दि. १७ जूलै,१९९९ रोजी झालेल्या दत्ताधिकार समितीच्या बैठकीत विचारार्थ ठेवण्यात आला. समितीने सदर प्रस्तावाची छाननी करुन असा निर्णय घेतला की, शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळाच्या मुख्य कार्यालयासाठी एकूण ३० पदे आणि ठाणे, नाशिक, नंदुरबार, जळगांव, अमरावती, यवतमाळ, नागपूर, गोंदिया, चंद्रपूर, गडचिरोली, नांदेड आणि अहमदनगर या १२ शाखा कार्यालयासाठी प्रत्येकी १० पदे मंजूर करण्यांत यावीत. या महामंडळासाठी पदे मंजूर करावयाचा प्रस्ताव मुख्य सचिवांचे अध्यक्षतेखाली सचिव समितीपुढे ठेवण्यांत यावा. संदर प्रस्ताव, मुख्य सचिवांचे अध्यक्षतेखाली सचिव समितीपुढे दि.२९.१०.१९९९ रोजी ठेवण्यात आला. सदर बैठकीत असा निर्णय घेण्यात आला की, शबरी महामंडळासाठी नवीन पदे निर्माण न करता आदिवासी विकास महामंडळाच्या मंजूर १३९१ पदामधून १५० पदे शबरी महामंडळाकडे वर्ग /

समायोजित करण्यांत यावीत. दिनांक १ डिसेंबर,१९९९ रोजी झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत आदिवासी विकास विभागाचा आढावा मंत्रिमंडळाने घेतला. शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळाकडे आदिवासी विकास महामंडळाकडील अतिरिक्त कर्मचारी समायोजित करुन सदर महामंडळ पुढील १०० दिवसात कार्यान्वित करावे असा मंत्रिमंडळाने निर्णय घेतला.

२. <u>शासन निर्णय</u> :- शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ पुढील १०० दिवसात कार्यान्वित होण्यासाठी सदर महामंडळासाठी एकूण १५० पदांपैकी पहिल्या टप्प्यात ७२ पदे निर्माण करण्यास शासन मंजुरी देत आहे. तसेच शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळाकरिता आवश्यक ती पदे निर्माण करण्याकरिता महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळ, नाशिक यांच्या आस्थापनेवरील सोबतच्या परिशिष्ट-"अ" मध्ये दर्शविलेली एकूण ९३ पदे प्रत्यार्पित करुन त्यांच्या समायोजनाव्दारे पहिला टप्पा म्हणून ७२ नवीन पदे सोबतच्या परिशिष्ट "ब" मध्ये दर्शविल्याप्रमाणे निर्माण करण्यास शासन मंजूरी देत आहे. नवीन मंजूर करण्यांत आलेली पदे, सहकारी आदिवासी विकास महामंडळाच्या किंवा इतर महामंडळाच्या कर्मचारी वर्गामधून भरण्यात यावीत. शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळाच्या कर्मचा-यांच्या सेवाशर्ती, आदिवासी विकास महामंडळाच्या सेवाशर्तीनुसार लागू रहातील.

३. शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळासाठी पहिला टप्पा म्हणून निर्माण करण्यांत येणा-या ७२ नवीन पदांचा वार्षिक आवर्ती खर्च रु.४२.१६ लाख इतका असून त्या मोबदल्यात व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळ, नाशिक यांच्या आस्थापनेवरील ९३ पदे (रु.४५.१० लाख) प्रत्यार्पित / वर्ग करण्यांत येत असल्यामुळे अतिरिक्त आर्थिक भार शासनावर पडणार नाही. तसेच व्यवस्थापकीय संचालकाचे एक पद निर्माण करण्यासाठी (मंत्रिमंडळाने मान्यता दिल्यानंतर)आदिवासी विकास महामंडळाने रु.३.०३ लाखाची बचत दाखविलेली आहे.व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळ यांनी शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळासाठी रु.४२.१६ लाख इतकी रक्कम वर्ग करावी.

४. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळ,नाशिक यांनी पुढील व्यवस्था होईपर्यन्त शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक म्हणून काम पहावे. तसेच व्यवस्थापकीय संचालकांनी सहकारी आदिवासी विकास महामंडळाकडील किंवा इतर महामंडळाकडील कर्मचारी / अधिकारी यांना शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळाकडे परसेवेवर घेण्याचा अधिकार त्यांना देण्यांत येत आहे.

५. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळ,नाशिक यांनी शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळासाठी एकूण १५० पदांपैकी दुस-या टप्प्यात उर्वरित ७८ पदे निर्माण करण्यासाठी जेवढा वार्षिक खर्च येणार आहे तेवढा निधी व पदे वर्ग / समायोजित करण्याबाबतचा प्रस्ताव शासनास सादर करावा.

Scanned with CamScanner

८/३

६. हा शासन निर्णय, प्रधान सचिव (वित्त) यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या दत्ताधिकार समितीने घेतलेल्या निर्णयानुसार, निर्गमित करण्यांत येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नांवाने,

(ज.ल.पावरा)
कार्यासन अधिकारी.

**प्रत :**

मा.राज्यपाल यांचे सचिव.
मा.मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव.
मा.उप मुख्यमंत्री यांचे सचिव.
मा.मंत्री (आदिवासी विकास) यांचे खाजगी सचिव.
सर्व मंत्री / राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव.
मा.राज्यमंत्री (आ.वि.) यांचे खाजगी सचिव.
मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन.
सचिव, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई.
सचिव, विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई.
सर्व मंत्रालयीन विभाग.
वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
महालेखापाल (लेखापरीक्षा) / (लेखा वअनुज्ञेयता), महाराष्ट्र -१/२, मुंबई / नागपूर.
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
जिल्हा कोषागार अधिकारी,नाशिक.
आयुक्त, आदिवासी विकास,महाराष्ट्र राज्य, नाशिक.
सर्व विभागीय आयुक्त.
सर्व जिल्हाधिकारी.
व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळ मर्या.,नाशिक.
व्यवस्थापकीय संचालक, शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ,नाशिक.
संचालक, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे.
अपर आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक / ठाणे / नागपूर /अमरावती.
सर्व प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प.
सचिव, भारत सरकार, सामाजिक न्याय व अधिकारिता मंत्रालय, नवी दिल्ली.
अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक, एन.एस.एफ.डी.सी., नवी दिल्ली.
आदिवासी विकास विभागातील सर्व अधिकारी / कार्यासने.
निवड नस्ती (का.३), आदिवासी विकास विभाग.

Scanned with CamScanner

## परिशिष्ट- अ

शासन निर्णय,आदिवासी विकास विभाग क्रमांक-आविम-१०९९/प्र.क्र.७/ का.३,
दिनांक १३ डिसेंबर,१९९९ चे जोडपत्र.

**महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळ मर्यादित., नाशिक या महामंडळाची सर्मपित करण्यांत येणारी पदे.**

| अ.क्र. | पदांचे नांव | वेतनश्रेणी (रुपये) | सर्मपित पदांची संख्या | वार्षिक खर्च (रुपये) |
|---|---|---|---|---|
| १ | उपव्यवस्थापक | १६४०- २९०० | ९ | ६३३,६३६ |
| २ | निरिक्षक | १६४० - २९०० | १६ | १,१२६,४६४ |
| ३ | लेखापाल | १६४० - २९०० | १ | ७०,४०४ |
| ४ | रोखपाल | ९५० - १५०० | १ | ४५,७४७ |
| ५ | लिपिक | ९७५ - १६६० | ४९ | २,०६९,१७२ |
| ६ | वाहनचालक | ९५० -१५०० | १ | ४१,६२८ |
| ७ | शिपाई | ७५० - ९४० | १६ | ५२२,८१६ |
| एकूण | | | ९३ | ४,५०९,८६७ |

Scanned with CamScanner

## परिशिष्ट "ब"

**शासन निर्णय, आदिवासी विकास विभाग क्रमांक- आविम-१०९९/प्र.क्र.७/का.३, दिनांक १३ डिसेंबर,१९९९ चे जोडपत्र.**

**शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळासाठी पहिला टप्पा म्हणून नव्याने मंजूर केलेली ७२ पदे.**

| अ.क्र. १. | पदाचे नांव २. | मंजूर पद संख्या ३. | वेतनश्रेणी (रुपये) ४. | मुख्य कार्यालय नाशिक ५. | जिल्हा / शाखा कार्यालय ६. | एकूण पदे (५+६) ७. |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | व्यवस्थापक | १३ | २०००-३५०० | १ | १२ (प्रत्येकी एक) | १३ |
| २ | उपव्यवस्थापक | १ | १६४०-२९०० | १ | - | १ |
| ३ | लेखापाल | १३ | १६४०-२९०० | १ | १२ (प्रत्येकी एक) | १३ |
| ४ | निरिक्षक | १२ | १६४०-२९०० | - | १२ (प्रत्येकी एक) | १२ |
| ५ | लघुटंकलेखक | १ | १२००-२०४० | १ | - | १ |
| ६ | वरिष्ठ सहाय्यक | २ | १२००-२०४० | २ | - | २ |
| ७ | रोखपाल | १ | ९५०-१५०० | १ | - | १ |
| ८ | लिपिक-नि-संगणक सहाय्यक | १४ | ९७५-१६६० | २ | १२ (प्रत्येकी एक) | १४ |
| ९ | वाहनचालक | १ | ९५०-१५०० | १ | - | १ |
| १० | शिपाई | १४ | ७५०-९४० | २ | १२ (प्रत्येकी एक) | १४ |
| | एकूण | ७२ | - | १२ | ६० (प्रत्येकी ५ पदे) | ७२ |

Scanned with CamScanner